महाराष्ट्र शासन
आरोग्य सेवा संचालनालय
(महाराष्ट्र राज्य)

आरोग्य भवन, सेंट जार्जेस रुग्णालय आवार, पी.डिमेलो रोड, मुंबई पिन कोड क्रमांक . -400 001

| | | |
|---|---|---|
| संचालक | (022) 22621031-36 | शासन संकेतस्थळ :-arpgya.maharashtra.gov.in |
| अति.संचालक ( मानसिक आरोग्य ) | (022) 22611471 | ई मेल :- director.dhs-mh@gov.in |
| सहसंचालक (असंसर्गजन्य रोग) | (022) 22653460 | कार्यासन- ८ अ ई मेल :- cdsm.npcb@gmail.com/npcb.mis@gmail.com |
| राज्य आरोग्य सोसायटी (अंनिका), मुंबई | (022)22621047 | बेटी बचाओ ,बेटी पढाओ |


क्र.संआसे/अंनिका/कक्ष ८ अ/नेचिअ/विनंती अर्ज/२७८६/ / २१, दि.१३/०८/२०२०

**विषय :- विनंती बदल्यांकरिता अर्ज सादर करणेबाबत ....**
**नेत्र चिकित्सा अधिकारी , गट क**

संदर्भ :- १. सामान्य प्रशासन विभाग यांचा शासन निर्णय क्र. एसआरव्ही-२०२१/प्र.क्र.२० /कार्या १२, दि.२९.०७.२०२१
२. मा.संचालक, आरोग्य सेवा, पुणे कार्यालय यांचे दि.१२.०८.२०२१ रोजीचे पत्र

उपरोक्त विषयास अनुसरून कळविणेत येते की, संदर्भिय क्र.१ चे शासन निर्णयान्वये दि.२५.०५.२००६ च्या अधिसुचनेन्वये अधिसुचित केलेला "महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियम आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम,२००५" मधील तरतुदीनुसार सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात राज्य शासकीय अधिकारी व कर्मचारी यांच्या सर्वसाधारण बदल्या दि.०९ ऑगष्ट,२०२१ पर्यत त्या त्या संवर्गातील एकूण कार्यरत पदाच्या २५ टक्के एवढया मर्यादेत बदली अधिनियमातली कलम ६ मध्ये नमुद केलेल्या सक्षम प्राधिका-यांच्या मान्यतेने करण्याबाबत सुचित केले आहे. तसेच विनंती बदल्या दि.३० ऑगष्ट,२०२१ पर्यत त्या त्या संवर्गातील एकूण कार्यरत पदाच्या १० टक्के एवढया मर्यादेत बदली अधिनियमातली कलम ६ मध्ये नमुद केलेल्या सक्षम प्राधिका-यांच्या मान्यतेने करण्याबाबत सुचित केले आहे.

सन २०२१-२२ च्या सर्वसाधारण बदल्या करतांना सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०१७/प्र.क्र.४१५/कार्यासन १२, दि.०९एप्रिल, २०१८ अन्वये गट क संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या बाबतीत समुपदेशनाद्वारे बदली बाबतचे धोरण शासनाने जाहिर केलेले आहे.

त्यानुसार सन २०२१-२२ मधील विशेष कारणास्तव विनंती बदल्या करण्यासाठी अत्यल्प कालावधी उरलेला असल्याने सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०१७/प्र. क्र.४१५/कार्यासन१२, दि.०९एप्रिल,२०१८ मधील विहीत परिशिष्ट १ सोबतचे विवरणपत्र १ मध्ये नमुद केलेल्या विशेष कारणाचे पृष्ठयार्थ कागदपत्रे सादर करुन विनंती बदली अर्ज या आयुक्तालयास दि.१८.०८.२०२१ पर्यंत दूपारी २.०० वाजेपर्यंत ई-मेल द्वारे edsm.npcb@gmail.com या ई-मेलवर पाठवून ती प्राप्त झाल्याची खातरजमा करावी. तसेच ज्या अधिकाऱ्यांकडून/कर्मचा-यांकडून विहीत मुदतीनंतर प्राप्त झालेल्या विनंती अर्जाची तसेच त्यांचे तक्रारींची दखल घेणेत येणार नाही याची नोंद घेणेत यावी.

Padmmavie

सहसंचालक, आरोग्य सेवा,
(असंसर्गजन्य रोग),मुंबई.

प्रति,
संबंधित अधिकारी/कर्मचारी (सर्व)